# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 123/2022 दिनांक : 24.03.2022

## 1)खुनः–

**धर्माबाद :–**दिनांक 21.03.2022 रोजी चे 07.00 ते दि. 22.03.2022 चे 06.00 दरम्यान, **आतकुर गावाजवळील रेल्वे पटरीवर ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे शंकर विठ्ठल बोगुलवार, वय 54 वर्षे, रा. तोंडाळा मंडळ तानुर राज्य तेलंगाणा** यास आरोपीने आपल्या पत्नी सोबत का झोपला म्हणुन याचा राग मनात धरून यातील मयताचा खुन केला व सदरचे प्रेत आतुकर शिवारात रेल्वे पटरीवर टाकुन पुराव नष्ट करण्याचा प्रयत्न केला. वगैर **फिर्यादी चंद्रकलाबाई भ्र. भुमय्या गड्डम, वय 50 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. वर्णी ता. बोधन. जि. निझामाबाद राज्य तेलंगाणा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरन 79/2022 कलम 302, 201 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री विजय पंतोजी, मो.नं. 9421761274** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :–

**1)उमरी :–**दिनांक 22.03.2022 रोजी चे 20.00 ते 20.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरा समोर इस्लामपुरा ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा शाईन कंपणीची चॉकलेटी कलरची मो सा क्रं. एमएच–26/बीएम–7034 किंमती 20,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी शंकर मैसाजी गायकवाड, वय 55 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. इस्लामपुरा ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 79/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1691 कदम, मो.क्र. 9623658510** हे करीत आहेत.

## 3)चोरी :–

**1)इतवारा :–**दिनांक 22.03.2022 रोजी चे 21.00 ते दि. 23.03.2022 चे 07.00 वा. चे दरम्यान, **शम्स हॉस्पीटल नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे नेहमी प्रमाण शम्स हॉस्पीटल देगलुर नाका नांदेड येथे डयुटीवर असताना शम्स दवाखान्यातील कॉउंटरवर ठेवलेलली पर्स व त्यामधील सोन्याचे दागने किंमती 46,795/–रूपयाचे तसेच पॅनकार्ड, आधारकार्ड, बॅकेचे पासबुक असे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी नसरीन बेगम भ्र. शेख अजिमोदीन, वय 55 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी सिस्टर रा. कामठा ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 53/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री गोटके, मो.क्र. 02462–236510** हे करीत आहेत.

**2)भोकर :–**दिनांक 22.03.2022 रोजी चे 23.00 ते दि. 23.03.2022 चे 09.00 वा. चे दरम्यान, **मौ. थेरबन येथील शेत शिवार ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे शेतातुन सर्व्हिस केबल वायर 1500 फुट किंमती 6000/–रूपयाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी भीमराव पि. यल्लपा दासरे, वय 45 वर्षे, व्यवसाय शेती रा. थेरबन ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 103/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1653 देवकांबळे, मो.क्र. 9923104521** हे करीत आहेत.

## 4)शासकीय कामात अडथळा :—

**1)वजिराबाद :—** दि.23.03.2022 रोजी चे 17.15 वा. चे सुमारास, **जिल्हा परिषद कार्यालय वजिराबाद नांदेड येथे**, यातील फिर्यादी हे यातील साक्षीदार यांचे सोबत कार्यालयीन कामकाजा विषयी चर्चा करत असतांना यातीन नमुद आरोपीने कार्यालयीन कक्षाचा दरवाजा ढकलुन आतमध्ये प्रवेश करून फिर्यादीस तुम्ही शिवाजी वारकड यास उपअभियंता पदाचा पदभार का देत नाही असे म्हणुन फिर्यादीस हुज्जत घालुन तुम्ही फक्त मंत्री यांचे ऐकता म्हणुन फिर्यादीचे हातातील फाईल्स हिसकाऊन घेवुन फेकुन दिली व तुम्हाला नांदेड जिल्हयात नौकरी करावयाची असेल तर मला 50,000/—रूपये द्यावे लागतील म्हणुन फिर्यादीस धक्काबुक्की करून शिवीगाळ केली व तु नौकरी कसा करतोस ते पाहुन घेतो असे म्हणुन फिर्यादीचे कार्यालयीन कक्षाचा दरवाजा ओढुन कक्षाच्या बाहेर जावुन कडी कोंडा लावुन घेतला व सेवक मनमथ नरवाडे यास धक्काबुक्की करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी ओमप्रकाश पि. वैजनाथ निला, वय 56 वर्षे, व्यवसाय कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 82/2022 कलम 353, 332, 342, 504, 506, 186, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री गोविंद जाधव, मो.क्र. 9823352701** हे करीत आहेत.

## 5)फसवणुक :—

**1)लोहा :—** दिनांक 23.03.2022 रोजी चे 11.15 चे सुमारास, **पोलीसवाडी तळयाच्या जवळ ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा पोलीस वाडी तळयाजवळ थांबलेले दोन अज्ञात आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीची मो सा थांबवुन आम्ही पोलीस वाले आहोत तिवारीला मारलेले तुम्हाला माहित आहे का असे म्हणुन फिर्यादीच्या हातातील अंगठी खिशात ठेवण्यास सांगीतले व फिर्यादीने अंगठी खिशात ठेवली असता खिशात हात घालुन दोन तोळे सोन्याची जुनी वापरती अंगठी किंमत अंदाजे 60,000/—रूपयाची काढुन घेवुन फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी किशन नामदेव चव्हाण, वय 68 वर्षे, व्यवसाय सेवानिवृत शिक्षक रा. हिराबोरी तांडा ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरन 67/2022 कलम 419, 170, 379, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री बगाडे, मो.नं. 7775901279** हे करीत आहेत.

## 6)अपघात :—

**1)सोनखेड :—** दिनांक 19.03.2022 रोजी चे 16.30 ते 16.45 वा. चे दरम्यान, **नांदेड ते लोहा रोडवर संघर्ष धाब्याचे समोर जानापुरी शिवार ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे विठ्ठल गंगाराम पळसे, वय 45 वर्षे, रा. गुंडेवारी ता. लोहा जि. नांदेड** हा नांदेड येथील काम करून आपले मो सा क्रं एमएच—26/बीवाय—5066 वर जावुन गांवी परत येत असतांना नांदेड ते लोहा रोडवर संघर्ष धाब्याचे जवळ रोड रूंदीकरणाचे कामाचे समोर सीसी रोडवर येताच यातील आरोपीन आपली पलसर मो सा क्रं एमएच—26/बीएन—8834 च्या चालकाने आपल्या ताब्यातील मो सा ही हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन लोहयाचे दिशेने येवुन यातील मयताचे मो सा ला जोराची धडक देवुन त्याचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी स्वप्नील विठ्ठल पळसे, वय 24 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. गुंडेवाडी ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सोनखेड** गुरनं. 50/2022 कलम 279, 304(अ), भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री विशाल भोसले, मो.क्र. 9960157059** हे करीत आहेत.

## 7)अवैध गुटखा बाळगला :—

**1)देगलुर :—** दिनांक 23.03.2022 रोजी चे 07.30 वा. चे सुमारास, **आरटीओ पॉईंटचे पुढे देगलुर ते मिर्झापुर जाणारे रोडवर महर्षी मार्कण्डेय मंदीराचे रोडवर देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या विवीध कंपणीचा गुटखा किंमती 1,08,000/—रुपयाचा चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/580 कृष्णा गंगाराम तलवारे, ने. पोस्टे देगलुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 149/2022 कलम 328, 188, 272, 273, भादवी सह कलम 26(2), 23, अन्न सुरक्षा कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री मोरे, मो.क्र. 9168751555** हे करीत आहेत.

**2)इतवारा :–** दिनांक 23.03.2022 रोजी चे 16.15 वा. चे सुमारास, **मच्छीमार्केट नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या विवीध कंपणीचा गुटखा किंमती 90,000/–रुपयाचा चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री गणेश अशोक गोटके, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 54/2022 कलम 328, 188, 272, भादवी सह कलम 26(2), सुरक्षा मानके 2006 नियम व नियमन 2011 चे कलम 26(2),59, 3, 22 30(2) ए अन्न सुरक्षा कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री असद शेख**, **मो.क्र. 9405000786** हे करीत आहेत.

**3)कंधार :–** दिनांक 23.03.2022 रोजी चे 15.00 वा. चे सुमारास, **भवानीनगर कंधार इंद्रप्रस्थ बारचे समोर भावना किराणा ॲंड जनरल स्टोर्स ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या विवीध कंपणीचा गुटखा किंमती 80,418/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री परमेश्वर भानुसींग चव्हाण, ने. स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 89/2022 कलम 328, 188, 272, 273 भादवी सह कलम 26(2), सुरक्षा मानके 2006 नियम व नियमन 2011 चे कलम 26(2),59, 3, 22 30(2) ए अन्न सुरक्षा कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री लोणीकर**, **मो.क्र. 9420841070** हे करीत आहेत.

## 8)गळफास घेवुन आत्महत्या :–

**मुखेड :–**दिनांक 23.03.2022 रोजी चे सकाळी 10.30 वा. ते 14.00 वा. चे दरम्यान**, मयताचे शेतात उमरदरी ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे देविदास पिराजी चिंतले, वय 50 वर्षे, व्यवसाय शेती रा. उमरदरी ता. मुखेड जि. नांदेड**, यानी मागी दोन वर्षापासुन शेतातील नापीकी मुळे व बॅंकेचे कर्ज कसे फेडावे या तणावातुन हेळयाचे झाडाचे फांदीला दोरीने गळफास घेवुन आत्महत्या केला. वगैरे **खबर देणार श्याम देविदास चिंतले, वय 28 वर्षे, व्यवसाय शेती रा. उमरदरी ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे मुखेड** आ. मृ. **12**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कुंभारे, मो.नं. 9823366626** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड